# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in
Phone :- 0721- 257 3027, 2572577

Web :- www.jdroamt.org
Fax :- 0721- 257 7913


जा.क्रमांक :- विकाअ/आस्था/२०१८/ 2881

दिनांक :- 05 DEC 2018

**परिपत्रक -**
**(महत्वाचे / दखलपात्र)**

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित/अशासकीय,
पदवि /पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त कृती आराखडा नुसारचे माहितीबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.: १६/गांधी जयंती/१५० /२०१८/५६१, दि. १७/०९/२०१८

२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.: विकाअ/आस्था/२०१८/२२२३, दि. १९/०९/२०१८

उपरोक्त विषयासंदर्भात माननीय केंद्रीय मानव संसाधन मंत्री यांनी महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त **वर्षभराचा कार्यक्रम** आयोजित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना दिल्या असल्याबाबत तसेच संचालक, तंत्रशिक्षण यांना संपुर्ण कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केले असल्याबाबत उक्त संदर्भ क्र. ०१ अन्वये या कार्यालयास कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र. ०२ अन्वये आपल्या संस्था स्तरावर वर्षभराचा कृती आराखडा तयार करुन त्यानुसार प्रत्येक कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा दैनंदीन अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत सुचित केले आहे.

वरील संदर्भांकीत परिपत्रकाचे अनुषंगाने आपले संस्थेचा दरमहा अहवाल या कार्यालयास वेळेवर प्राप्त होत नाही. अहवाल प्राप्तीसाठी आपले संस्थेस वारंवार दुरध्वनीव्दारे संपर्क करावा लागतो. यामुळे आपले मार्फत संदर्भांकीत परिपत्रकांची दखल घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास येत आहे. याबद्दल खेद व्यक्त करण्यात येत आहे.

**तरी आपणास पुनःश्च सुचित करण्यात येते की, वरील संदर्भांकीत परिपत्रक क्र. ०२ मधील सर्व मुद्येनिहाय कार्यक्रम आपले संस्था स्तरावर राबविण्यात यावेत. सदर परिपत्रकातील मुद्या क्र. ११ "सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधीचे सामाजिक कार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टिने वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी" बाबत कोणत्याही संस्थेने कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे आज दिनांक ०५/१२/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता मंत्रालयात आयोजीत केलेल्या सभेसाठी मा. संचालक महोदयांना माहिती सादर करता आलेली नाही. सदरची बाब गंभीर आणि दखलपात्र आहे.**

प्राचार्यांनी सदर कार्यक्रमांबाबत स्वत: जातीने लक्ष घालून कार्यक्रम राबवावेत व प्रत्येक कार्यक्रमाचा तपशिल, छायाचित्रे, व्हीडीओ यांना आपल्या स्तरावर योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी व याबाबतचा दरमहा अहवाल न चुकता या कार्यालयात आवश्यक त्या तपशिलासह सादर करण्यात यावा.

तसेच संचालनालयाने वेळोवेळी कालमर्यादेत मागणी केलेली माहिती आपणाकडून निर्धारीत वेळेत प्राप्त होत नाही. यासाठी आपणास निर्देशित करण्यात येत आहे की, संस्था स्तरावर एखाद्या अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदारी निश्चित करुन द्यावी. आणि कार्यपुर्ततेबद्दल आपणाकडून वैयक्तिक पाठपुरावा करण्यात यावा.

(डॉ.द.व्यं.जाधव)
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**

Scanned by CamScanner